# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी,२०२६**

**(दुपारी १२.०० वाजता)**

**एक : मंत्र्यांचा परिचय**

**दोन : प्रश्नोत्तरे**

**तीन : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**चार : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.**

**पाच : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : "सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १३ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, 2025"

(२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

(क) "सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक १ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, 2026 "

(ख) "सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, 2026"

(३) **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** : "सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १४ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, 2025 "

**सहा : सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.**

**सात : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करणे.**

रोटा/एचबी-१०८० (१,८००-०२-२०२६)-1

आठ **डॉ.प्रज्ञा राजीव सातव, वि.प.स. यांच्या राजीनाम्याची घोषणा**

नऊ **सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.**

दहा : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

अकरा : **लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(१) **सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसाचा भाग असलेल्या माहिम येथील मच्छिमार कॉलनीतील इमारत क्र. 1 ते 20, पोलीस वसाहतीतील इमारत क्र. 1 ते 25 आणि परिसरातील 4 स्वायत्त वसाहती आणि म्हाडा कॉलनीचा क्लस्टर पध्दतीने विकास करण्याबाबत स्थानिकांच्या मागणीनुसार मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन देण्यात आलेले असणे, राज्य शासनाच्या पुढाकाराने बी.डी.डी. चाळ पुनर्विकास करण्यात आला त्याच धर्तीवर या ठिकाणी क्लस्टर पध्दतीने विकास करण्यात आल्यास या जीर्ण झालेल्या इमारतीत राहत असलेल्या नागरिकांना मूलभूत सोईसुविधा उपलब्ध होऊ शकतील, सद्य:स्थितीत येथील नागरिकांना मूलभूत सोईसुविधा उपलब्ध नसल्याने त्यांच्यात पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाचे वातावरण, माहिम येथील मच्छिमार कॉलनीतील इमारत क्र. 1 ते 20, पोलीस वसाहतीतील इमारत क्र. 1 ते 25 आणि परिसरातील 4 स्वायत्त वसाहती आणि म्हाडा कॉलनीचा क्लस्टर पध्दतीने विकास करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. "

**(२) श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे [सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)]** लक्ष वेधतील :-

"हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गामुळे विदर्भ आणि मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला मोठी गती मिळालेली असताना, उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि

अहमदनगर या पाच जिल्ह्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी अशाच अद्ययावत 'ॲक्सिस कंट्रोल' जोडणीचा प्रचंड अभाव असणे, राज्याच्या एकूण जीडीपीमध्ये उत्तर महाराष्ट्राचा वाटा सुमारे 15 टक्क्यांहून अधिक असूनही, मुंबई-आग्रा महामार्गावरील मालेगाव सारख्या वस्त्रोद्योग केंद्रांना समृद्धी महामार्गाचा थेट लाभ मिळत नसणे, ज्यामुळे घोटी-इगतपुरी ते मालेगाव आणि पुढे नगर-मनमाड-कोपरगाव येथील समृद्धी इंटरचेंजपर्यंत नवा 4 पदरी महामार्ग तयार होणे तातडीचे असणे, नाशिकमधील सातपूर, अंबड व सिन्नर औद्योगिक वसाहतींमधील उत्पादन क्षेत्राला, जागतिक दर्जाच्या द्राक्ष निर्यातीला आणि नगरमधील 35 हून अधिक साखर कारखान्यांच्या कृषी आधारित उत्पादनांना या कनेक्टिव्हिटीमुळे नवी गती मिळून उत्तर महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न वाढण्याची मोठी संधी उपलब्ध असणे, सध्याच्या पारंपरिक मार्गावरील प्रचंड वाहतूक कोंडीमुळे इंधनाचा अपव्यय आणि अपघातांचे प्रमाण वाढत असून यामुळे दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरला पूरक कनेक्टिव्हिटी उपलब्ध होत नसणे, तरी शासनाने उत्तर महाराष्ट्राच्या विकासाला विदर्भ-मराठवाड्याच्या समकक्ष आणण्यासाठी या नियोजित ॲक्सिस कंट्रोल मार्गाचे तातडीने सर्वेक्षण करणे, भूसंपादनासाठी भरीव निधी उपलब्ध करून देणे, कालबद्ध कार्यक्रम आखून युद्धपातळीवर या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

(३) **सर्वश्री पंकज भुजबळ, अमोल मिटकरी, इद्रिस नायकवडी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक जिल्ह्यातील लासलगाव ही आशिया खंडातील कांद्याची अग्रगण्य बाजारपेठ असून हे शहर झपाट्याने विकसित होत असणे, गेल्या 15 वर्षांत येथील लोकसंख्या तिपटीने वाढून ती 30 हजारांच्या वर गेली असणे, सध्या लासलगाव शहरासाठी 16 गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणी दिले जात असणे जे लोकसंख्येच्या तुलनेत अत्यंत अपुरे असणे, मात्र तांत्रिक अडचणींमुळे हा पुरवठा वारंवार खंडित होत असणे, अनेकदा नागरिकांना 15 दिवस ते महिनाभर पाण्याविना राहावे लागत असणे, यामुळे जन सामान्यांमध्ये निर्माण होत असलेले असंतोषाचे वातावरण, लासलगाव शहरासाठी पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शहरापासून 10 कि.मी. अंतरावर असलेल्या 'खडक माळेगाव धरण' येथून स्वतंत्र जलवाहिनी टाकून नवीन पाणीपुरवठा योजना

राबवणे अत्यंत आवश्यक असणे, ही योजना राबविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली असणे, मात्र याबाबत शासनाकडून दिरंगाई व टाळाटाळ होत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असणे, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील सांगली जिल्हा बेदाण्याची पंढरी म्हणून देशभर प्रचलित असणे, बेकायदेशीर कामे करणाऱ्या व्यापाऱ्यांवर भेसळ प्रतिबंधक कारवाई कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्यासाठी तसेच परकीय बेदाणे भारतीय म्हणून विकणाऱ्या व्यापाऱ्यांचा विक्री परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यासाठी जिल्ह्यातील विविध शेतकरी संघटनांनी दिनांक 5 जानेवारी, 2026 रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केलेले असणे, भारतासह जगभर दर्जेदार बेदाण्याचे उत्पादन झाल्यावर निर्यात करून बेदाण्याचे जीआर मानांकन मिळवण्याची किमया या जिल्ह्याने केलेली असणे, देशासह जगभरात निर्यात होणाऱ्या बेदाण्यांपैकी 70 % पेक्षा जास्त बेदाणा हा सांगली-तासगावचा असणे, मागील दोन वर्षात बेदाणा उत्पादनात कमालीची घट झाल्यामुळे त्याच्या दरात दुपटीने वाढ झाली असणे, परंतु याचा फायदा सांगली तासगावच्या बेदाणा इंडस्ट्रीवर ठाण मांडून बसलेल्या काही व्यापाऱ्यांनी घेतला असणे, अफगाणिस्तान तसेच चीन सारख्या देशांतून निकृष्ट दर्जाचा बेदाणा चोरट्या मार्गाने आयात करून तो महाराष्ट्रातील बेदाण्याच्या बॉक्समध्ये घातक प्रक्रिया करून राजरोसपणे विकला जाणे, द्राक्ष बागायतदार संघाने याबाबत बाजार समिती व प्रशासन यांच्याकडे अनेक वेळा तक्रारी दिल्या असणे, उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने त्यांच्यामध्ये पसरलेली असंतोषाची भावना, बेकादेशीर कामे करणाऱ्या दोषी व्यापाऱ्यांचे परवाने बाजार समितीने कायमस्वरूपी रद्द करण्याची आवश्यकता, त्यामुळे अवैध कृत्यांना प्रतिबंध म्हणून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

(५) **ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, सर्वश्री. सदाशिव खोत, ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री. संजय केणेकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या

बाबीकडे **माहिती व तंत्रज्ञान मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात 18 वर्षांखालील सुमारे 4 कोटीहून अधिक बालके असून त्यापैकी जवळपास 3 कोटी बालके 15 वर्षाखालील असणे, राज्यात शालेय व अल्पवयीन विद्यार्थ्यांमध्ये मोबाइलवर ऑनलाईन गेम्स खेळण्याचे प्रमाण वाढत असून याविषयी पालकांनी चिंता व्यक्त केली असणे, परिणामी मुलांचे मानसिक, शैक्षणिक आणि सामाजिक आरोग्य धोक्यात आले असणे, शिक्षणासाठी आवश्यक असलेला मोबाइल आज अनेक मुलांसाठी व्यसनाचे साधन ठरत असल्याने मोबाइलमधील गेम्सवर बंदी घालण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, 2026 वा त्यादरम्यान केली असणे, ऑनलाइन वर्ग, अभ्यास, माहिती संकलन आदी कारणांसाठी ही मुले मोबाइलचा सर्रास वापर करीत असणे, लहान वयातच स्क्रीनवरील वाढता वेळ मुलांच्या विकासासाठी घातक ठरत असून मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये एकाग्रतेचा अभाव, चिडचिडेपणा, झोपेचे विकार, अभ्यासातील घसरण, मानसिक तणाव वाढत असणे, मोबाईल गेम्सवरील बंदी, मुलांचे समुपदेशन व त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारण्याची आवश्यकता, मैदानी खेळ, वाचन व कुटुंबाशी वेळही कमी होत असणे, हे चित्र देशाच्या भविष्यासाठी गंभीर असल्याची भावना राज्य शिक्षक परिषदेने व्यक्त करणे, त्यामुळे मुलांच्या मानसिक, शैक्षणिक आणि सामाजिक आरोग्यावर घातक परिणाम करणारे मोबाइलवरील ऑनलाइन गेम्स तत्काळ बंद करावेत किंवा त्यावर कठोर निर्बंध आणण्याकरीता शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**(६)** **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **फलोत्पादन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"चालू वर्षी अवेळी पाऊस, तीव्र हवामान बदल, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव, खत-औषधांच्या दरातील अनियंत्रित वाढ, मजुरी खर्चातील मोठी वाढ आणि बाजारभावातील प्रचंड चढ-उतार या सर्वांनी आंबा बागायतदारांचे कंबरडे मोडले असणे, अनेक आंबा बागायतदारांनी वार्षिक कराराने बागा घेतल्या असणे, उत्पादन मिळण्यासाठी त्यांनी मोठा खर्च देखील केला असणे, परंतु बहुतांश आंबा बागायतदारांना उत्पादन आणि उत्पन्न यांचा ताळमेळ बसत नसल्याचे आणि काही ठिकाणी खर्चही निघत नसल्याची वस्तुस्थिती समोर आली असणे, आंबा हा कोकणाचे केवळ कृषी

उत्पादन नसून तो कोकणाच्या ओळखीचा आणि अर्थव्यवस्थेचा कणा असणे, परंतु विपरीत परिस्थितीमुळे आंबा उत्पादक शेतकरी बँकांच्या कर्जदबावाखाली, मानसिक-आर्थिक तणावाखाली जगत असणे, हे अत्यंत चिंताजनक असणे, आंबा पीक हे कोकणाच्या अर्थव्यवस्थेचा, हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आणि ग्रामीण स्थैर्याचा प्रश्न असणे, आंबा पिकाला हमी भाव मिळत नसल्याने शेतकऱ्याची होत असलेली ससेहोलपट, शिवाय आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे कोकणातील आंबा बागायतदारांमध्ये शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची भावना, कोकणातील हजारो आंबा बागायतदार/ शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी आंब्याला हमीभाव देण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई अदा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया. "

**बारा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**तेरा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस)**

**चौदा : सर्वश्री प्रविण दरेकर, हेमंत पाटील, विक्रम काळे, सदाशिव खोत, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, सर्वश्री सतिश चव्हाण, दादाराव केचे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, डॉ. परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, अमोल मिटकरी, योगेश टिळेकर, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, अमित गोरखे, इद्रिस नायकवडी, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री संजय केणेकर, संदीप जोशी, वसंत खंडेलवाल, प्रसाद लाड, अमरिशभाई पटेल, ॲड. निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री. धर्मगुरू बाबूसिंग राठोड, वि.प.स.** यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri २०२६' ही परिषद शेतक-याला जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतक-यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांतून आणि

सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांमुळे शेडयुल १ मधून शेडयुल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, सन २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

**पंधरा : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

**(१) सर्वश्री विक्रम काळे, अमोल मिटकरी, शिवाजीराव गर्जे, वि.प.स.**

**"राज्यातील शाळांना सन २०२४-२५ या वर्षाची पटसंख्या ग्राह्य धरून अनुदान मिळणेबाबत"** या विषयावरील **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक ५३२३ ला दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील

**(२) डॉ.परिणय फुके, श्री. प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**

**"नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये स्मशानभूमी नसल्याबाबत"** या विषयावरील **श्री. संदिप जोशी, वि.प.स. यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक ५७७४ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२६.

**डॉ.विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.